प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

ऑक्टोबर 9, 2018

**इंडियन मर्कंटाईल को-ऑपरेटिव बँक लि. हयांचेवर आरबीआयकडून आर्थिक दंड लागु**

भारतीय रिझर्व बँकेने, आदेश दि. सप्टेंबर 26, 2018 अन्वये, इंडियन मर्कंटाईल को-ऑपरेटिव बँक लि. ह्यांचेवर रु.20 लक्ष दंड लागु केला असून तो दंड, त्या बँकेने तिला दिलेल्या सर्वसमावेशक निर्देशांचे (एआयडी) केलेले उल्लंघन, फसवणुकींचे वर्गीकरण व कळविणे हयावरील आरबीआयने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन न करणे हयासाठी लावण्यात आला आहे. वर दिलेले निर्देश व आरबीआयने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे, वरील बँकेने अनुपालन न केल्याने, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 46(4)(i) सह वाचित, कलम 47अ(1)(क) आणि कलम 56 खाली आरबीआयला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन हा दंड लावण्यात आला आहे.

ही कारवाई विनियामक अनुपालनातील त्रुटींवर आधारित असून तिचा संबंध वरील बँकेने तिच्या ग्राहकांबरोबर केलेले व्यवहार किंवा करार हयांच्याशी नाही.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2018-2019/832**